# योगशक्ति दादी जानकीजी – एक अलौकिक व्यक्तित्व

राजयोगिनी ब्रह्माकुमारी दादी जानकीजी ह्या आंतराष्ट्रीय संस्था प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका म्हणून सेवारत आहेत. विश्व विद्यालयाच्या स्थापनेपासूनच अर्थात सन 1937 पासून त्या समर्पित आहेत. गेल्या 70 वर्षापासून पाचही महाद्विपांमध्ये राजयोगाच्या प्रचार आणि प्रसारासाठी परिभ्रमण करुन विश्वात शांती स्थापन करण्याच्या कार्यात आपले अलौकिक योगादन देणा-या दादीजी विश्वात सर्वात स्थिर मनाच्या महिला म्हणून गौरविण्यात आलेल्या आहेत. दादी जानकी जी यांचा जन्म सन् 1916 मध्ये सिन्ध प्रान्तात एका धार्मिक परिवारामध्ये झाला. त्या 1936 अर्थात ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या स्थापनेपासूनच विद्यालयाच्या संपर्कात आल्यात. संस्थेचे साकार संस्थापक प्रजापिता ब्रह्माबाबा आणि परमात्मा शिव यांच्या निदेर्शनुसार त्यांनी जीवनात आध्यात्मिकतेचे सर्वोच्च शिखर पादाक्रांत केले. दादी जानकी यांनी अमोघ वाणीने अनेकांना राजयोगाचा सन्मार्ग दाखविला. सन 1974 मध्ये त्यांनी आध्यात्मिक ज्ञानाची मशाल हाती घेऊन संपूर्ण विश्वाला अलौकिक बनविण्यासाठी त्याच प्रमाणे विदेशात राजयोगाचा प्रसार करण्यासाठी त्या ब्रिटन मध्ये गेल्या . तेव्हा पासून आजागायत त्याग, तपस्या आणि अथक सेवेसाठी भारतातून बाहेर पश्चिमेकडील 129 देशात ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रांचे कुशल संचलन त्या करीत आहेत. भौतिकतेचा आकर्षणमयी देशांत लोकांमध्ये आध्यात्मिक जागृति पसरवून भारतीय संस्कृतिची ओळख दादी जानकीजी यांनी करुन दिली. करुणा दयेची प्रतिमूर्ती दादीजींचे हृदय सर्व प्राणीमात्रांमध्ये प्रेम आणि सदभावनेने परिपूर्ण आहे. राजयोग आणि आध्यात्मिक ज्ञानाच्या आधारावर त्यांनी आध्यात्मिकतेद्वारे योगाचे अनेक प्रयोग केलेत. तपस्वीमूर्त दादीजींनी आपल्या मनाच्या अघाद शक्तिंनी वैज्ञानिकांसुध्दा आचंबित केलेले असून याचाच परिपाक म्हणून त्यांना आस्ट्रेलिया येथील यूनिवर्सिटी ऑफ मेलबोर्न, सन फ्रानसिस्को येथील यूनिर्व्हसीटी ऑफ केलिफोर्निया, यू.एस.ए. मध्ये टेक्सास यूनिवर्सिटी सारख्या प्रख्यात विद्यापिठांतील वैज्ञानिकांनी दादीजींच्या मानसिक स्थितीचे परिक्षण करुन आपसात विचार विमर्श करुन प्रयोगाअंती जगातील स्थिरमनाची महिला म्हणून गौरवान्वित केले. विविध गणितीय प्रश्नांचे उत्तर देतांना आदरणिया दादीजींच्या मस्तिष्कामधून सतत डेल्टा तरंगे प्रवाहित होत होती, सर्वसाधारणपणे मानव गहन निद्रेत असे डेल्टा तरंगे प्रसारित करीत असतो. विश्वामध्ये योगांचे जितके प्रकार प्रचलित आहेत त्या सर्वांवर वैज्ञानिकांनी असल्या प्रकारचे परिक्षण केले परंतू त्यांना दादींजीवरील केलेल्या परिक्षणासारखा अदभूत परिणाम पहावयास मिळाला नाही. परिणामतः त्यांना सर्वश्रेष्ठ प्रज्ञायोगी घोषित करुन गौरविण्यात आले. त्यांनी अनेक भव्य आध्यात्मिक परियोजना कार्यान्वित केलेल्या आहेत, ज्यायोगे विश्वातील अनेकांचे जीवनातील आशेचा अंकुर फुलविला गेला. ब्रह्माकुमारीज् एक

अशासकीय आध्यात्मिक शैक्षणिक संस्था आहे. 1977 मध्ये `जानकी फाऊण्डेशन फॉर ग्लोबल हेल्थ केयर` ची स्थापना केली गेली गेली. ज्यायोगे लाखों रुग्णांची शारिरीक आणि मानसिक रोगांपासून सुटका झाली. दादीजानकीजी यांच्या कुशल नेतृत्वाखाली भारता सहीत 130 देशातील 8 हजार सेवाकेंद्रे मूल्यनिष्ठ समाजाच्या स्थापनेसाठी कटिबद्ध आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेचे आणि युनिसेफ मध्ये सल्लागार म्हणून विद्यालयास दर्जा बहाल करण्यात आलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय शांती वर्ष साजरे करण्यात विश्वविद्यालयाच्या योगदानासाठी त्यांना विक्रमी सातवेळा शान्तिदूत पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. संपूर्ण विश्वभरात आठ लाखाहून अधिक व्यक्ति या संस्थेच्या सदस्य रुपाने जोडल्या गेलेल्या आहेत.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com